क्रमांक : ५१२४ /क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ०८ मार्च, २०२३

**विषय :- या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीची नोंद बायोमेट्रीक प्रणालीवर करण्याबाबत**

**संदर्भ :- १) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक २३८०६/क-१, दि. ३० नोव्हेंबर, २०२२**
**२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ३९८१/क-१, दि. २१ फेब्रुवारी, २०२३**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये कार्यालयातील उपस्थितीची नोंद करण्याकरिता नव्याने स्थापित करण्यात आलेल्या बायोमेट्रिक यंत्रणेवर नोंदणी करण्याबाबत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना अवगत करण्यात आले होते.

त्यानुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची कार्यालयात येण्याची व कार्यालयातून जाण्याची या वेळेची उपस्थितीची नोंद करण्याकरीता सोमवार, दिनांक १३ ते शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीत प्रायोगिक तत्वावर बायोमेट्रीक यंत्रणा सुरु करण्यात येणार आहे व त्यासोबत हजेरीपट देखील उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

त्यानुसार या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सोमवार, दिनांक १३ ते शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीत कार्यालयात येताना व कार्यालयातून जाताना उपस्थितीची नोंद हजेरीपट व बायोमेट्रिक यंत्रणा या दोन्ही ठिकाणी नोंदवावी.

आदेशानुसार

**(सायली कांबळी)**
उप सचिव (विधी)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

..२/-

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व मा.समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) क-२ संगणक कक्ष

११) निवडनस्ती.